सन २०११ मध्ये सरळसेवेने प्रविष्ठ झालेल्या परिविक्षाधीन उपनिबंधक, सहकारी संस्था गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र. राजस २०१७/प्र.क्र.२५०/५-स
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २२ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u> :

१) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.राजस १०११/प्र.क्र.१/५-स, दि.२१/९/२०११
२) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, दि.३०/४/२०१६
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्थापना/ कक्ष-२/अ-१/परि.व.१/बुरांडे/७२६/२०१७, दि.६/७/२०१७ व क्र.११६७,दि.९/९/२०१७.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोल्लेखित संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये एकूण ११ उमेदवारांना परिविक्षाधीन उपनिबंधक, सहकारी संस्था गट-अ या संवर्गात दोन वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी १ उमेदवार सेवेत रुजू झाले नाहीत. उर्वरित १० उमेदवारांपैकी ७ अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण करण्याचा आदेश संदर्भाधीन क्र.२ येथील दि.३०/४/२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. आता संदर्भाधिन क्र.३ नुसार १ उमेदवार श्रीमती पर्णिता धों.बुरांडे परिपूर्ण माहिती संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये शासनास प्राप्त झाली आहे. उपरोक्त नियुक्ती आदेशातील अटींनुसार दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेल्या खालील अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दिनांकापासून समाप्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे आता सदर दिनांकापासून प्रस्तुत अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावर नियमित नियुक्ती देण्यात येत आहे.

अ.क्र.	परिविक्षाधीन उपनिबंधक, सहकारी संस्था गट-अ यांचे नाव	परिविक्षा कालावधी सुरु झाल्याचा दिनांक	परिविक्षा कालावधी समाप्त झाल्याचा दिनांक	रजा कालावधी असल्यास	नियमित नियुक्तीचा दिनांक
१	श्रीमती पर्णिता धों.बुरांडे	१७/१०/२०११	२५/१०/२०१३	९ दिवस	२६/१०/२०१३

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधितांना कळवून उपरोक्त अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकात योग्य ती नोंद घेण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्या संगणक सांकेतांक २०१७११२२१६२६५६४००२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334edd f7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2017.11.22 16:30:46 +05'30'

(डॉ.सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन व लेखापरिक्षण)
६) सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था गट-अ
७) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
८) निवासी लेखा अधिकारी,
९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०) संबंधित अधिकारी, द्वारा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) निवड नस्ती ५-स